♦ वर्ष ७ ♦ अंक १९ ♦१ सप्टेंबर २०१२ ♦ पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

♦ **कार्यकारी संपादक** ♦
डॉ. महावीर अक्कोळे

♦ **सह संपादक** ♦
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

♦ **निवासी संपादक** : सदाभाऊ खोत

♦**मानद सल्लागार** : मा.-श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी. जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ♦ **व्यवस्थापक** : सुभाष शेट्टी
♦ **कार्यालय** : भरत पतसंस्थेचा माळवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, रायबाई रोड, पोलिस स्टेशनजवीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रसिद्ध केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, रायबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

कावीळ साथ : स्वाभिमानीबरोबर जयसिंगपूरचे डॉक्टर्स कार्यरत

खासदार राजू शेट्टी यांनी इचलकरंजीच्या काविळीच्या साथीने थैमान घालण्यास चालू करण्यापूर्वी साधारण सहा महिने आधी कोल्हापूरच्या तत्कालीन जिल्ह्याधिकांऱ्याकडे एक मागणी अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली होती. काय होती ती लेखी मागणी? पुढच्या दुखद आणि दुर्दैवी भविष्याचा जणू वेध घेणारी ती होती. त्या मागणीचा विचार असा होता की, पावसाळा येण्यापूर्वी पंचगंगा नदीत पाणी साठून राहिलेय ते प्रचंड प्रमाणा प्रदुषित आहे व ते जास्त प्रदुषित होत जाण्याचा धोका असल्याने पंचगंगा काठच्या गावातील भारनियमन थोड शिथिल करून शेतीसाठी वापरण्याचा आदेश काढावा, जेणे करून सध्या शेतीला आत्यंतिक गरजेचे असलेले पाणीही मिळेल व प्रदुषित पाण्याचा निचराही होईल. त्यानंतर धरणातून पाणी सोडून पंचगंगेचा प्रवाह वाहता करावा जेणेकरून नदीकाठच्या गावांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळेल. पण नेहमी निष्क्रिय शासकीय खाक्याला जागून जिल्हा प्रशासनाने खा. शेट्टींच्या मागणीकडे पुर्ण दुर्लक्ष केले. त्यातच पावसाने ओढ दिल्याने प्रदुषित पाणी साठत गेले. अशा पाण्याचा जिथे जिथे झाला त्या गावात काविळीच्या साथीने थैमान घालायला सुरूवात केली. त्यात इचलकरंजी या शहराला सर्वाधिक फटका बसला. या प्रदुषित पाण्याने इचलकरंजी ला

पान ९ वर ▶

तिसरा ॲड़व्हॉन्स पाचशे रुपये द्या

जयसिंगपूर(प्रतिनिधी): उसाचा तिसरा ॲड्व्हॉन्स प्रति टन ५०० रूपये गणेशोत्सोवापूर्वी त्वरीत द्या, अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सर्वच कारखान्यातील साखरेचे आऊट गोईंग बंद करण्यात येईल असा इशारा शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील साखर कारखान्यांना देण्यात आला. यावेळी शरद, दत्त, गुरूदत्त, पंचगंगा, जवाहर व वारणा साखर कारखान्यांवर जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांनी मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

सध्या साखरेचे दर तेजीत आहेत. त्यातच १९७२ नंतर पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच मोठा दुष्काळ पडला असून यामध्ये शेतकरी वर्ग भरडून निघत आहे. यंदा उसाची मोठ्या प्रमाणात टंचाई भासणार आहे. तसेच आगामी काळात साखरेचे दर वाढणार असून याचा फायदा साखर कारखान्यांना होणार आहे. गतवर्षी साखरेचे दर २८ रूपये प्रति किलो होता. सध्या मात्र ३६ रूपयांच्या घरात आहे. याचा दरवाढीचा मोठा फायदा जिल्ह्यातील साखर कारखान्यांना झाला आहे. मुळातच खताच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. मजुरी, पाणीपट्टी, वीज बिल आदीमुळे शेतकऱ्यांना उसाची शेती परवडनासे झालेली आहे. सद्य स्थितीत शेतकरी आर्थिक संकटात असून साखर कारखान्यांकडून तिसरा हप्ता देण्यात टाळाटाळ केली जात आहे. याबाबतचे निवेदन संबंधित साखर कारखान्यांना देण्यात आले. तसेच गणेश चुतर्थीच्या पूर्वी तिसरा हप्ता न दिल्यास साखर कारखान्यांच्या विभागीय कार्यालयांना टाळे ठोकून गोडावूनमधून बाहेर पडणारी साखर बंद पाडली जाईल. असा इशाराही यावेळी देण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे यांच्या अध्यक्षतेखाली हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी बांधकाम सभापती सावकर मादनाईक, पंचायत समिती सभापती युनुस पटेल, शिरोळ तालुकाध्यक्ष आदिनाथ हेमगिरे, अण्णासो चौगुले, के. आर. चव्हाण, महादेवराव धनवडे, संतोष जाधव, रमेश भोजकर, रामचंद्र फुलारे, सागर संभूशेटे, विठ्ठल मोरे, जयकुमार कोले, महेश पाटील, अण्णा जोंग, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५४२२ २२१९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५४२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वतःचे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ ... देशातील प्रमुख ४८८ शहरांमधील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ ...

श्री. व्ही. बी. हुल्ले. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाल. बी. कॉम व्हा. चेअरमन

पै. विठ्ठल बाबुराव मोरे एम. ए. चेअरमन

व सर्व संचालक

TEXMO INDUSTRIES Taro

• अधिकृत विक्रेते •

बाहुबली इलेक्ट्रिकल्स

गोमटेश इलेक्ट्रिकल्स

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

M/S. MANGAVE BOREWELLS

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266

Shree Datta Prestrestess

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.

अब्दुललाट : येथे विविध विकासकामांच्या प्रारंभ कार्यक्रमप्रसंगी बोलताना खासदार राजू शेट्टी. शेजारी सावकार मादनाईक, युनूस पटेल, विजय भोजे, अप्पा पाटील, डॉ. वृषभ चौगुले, सौ. अश्विनी कांबळे.

सर्वसामान्यांसाठी शक्ती खर्ची घालणार

राजू शेट्टी : अब्दुललाट येथे विकासकामांचा प्रारंभ

इचलकरंजी : सर्वसामान्य माणूस हीच माझी खरी ताकद आहे, त्यामुळे माझी सर्व शक्ती ही सर्वसामान्यांसाठीच खर्च करत आहे, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी येथे केले. अब्दुललाट (ता. शिरोळ) येथील पंचायत समिती सदस्या आणि शिरोळ पंचायत समितीच्या उपसभापती सौ. अश्विनी कांबळे यांच्या प्रयत्नाने समतानगर येथे खासदार निधीतून डांबरीकरण जिल्हा परिषद बांधकाम सभापती सावकार मादनाईक यांच्या निधीतून बौद्ध वसाहतीतील डांबरीकरण आणि उपसभापती सौ. कांबळे यांच्या निधीतून इंदिरानगर येथील समाज मंदिराच्या संरक्षित भिंतीच्या बांधकामाचा प्रारंभ कार्यक्रमात खासदार शेट्टी बोलत होते. अध्यक्षस्थानी शिरोळ पंचायत समितीचे सभापती युनूस पटेल होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ''माझी आणि माझ्या पक्षाची वाटचाल या महामानवांच्या विचारानेच सुरू असल्यानेच शिरोळ पंचायत समितीच्या सर्वोच्च पदावर मुस्लिम आणि दलितांना प्रतिनिधित्व देऊन त्यांचा सन्मान केला आहे.''

बांधकाम सभापती सावकार मादनाईक म्हणाले, ''स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना जनतेच्या सहकार्याने जी सत्ता आणि पदे मिळत आहेत त्यांचा वापर जनतेच्या हितासाठीच केला जात आहे. येणाऱ्या काळात जनतेचे अनेक प्रश्न मार्गी लावू.''

सौ. अश्विनी कांबळे, विजय भोजे, सभापती युनूस पटेल, पंचगंगा साखर कारखान्याचे संचालक एम. आर. पाटील, अप्पा पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. शंकर पाटील, पायगोंडा पाटील, शीतल कंठी, राजेंद्र नाईक, सुरेश शेडबाळे, सुमतीनाथ शेट्टी, सौ. जयश्री पाटील, कुसुम परीट, जयश्री आवळे, डॉ. वृषभ चौगुले, श्रीकांत मधाळे उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक मोहन कांबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन आणि आभार शशिकांत मुद्दापुरे यांनी मानले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या हातकणंगले तालुकाध्यक्षपदी संतोष जाधव, तर युवा आघाडीच्या अध्यक्षपदी प्रफुल्ल मगदूम

स्वाभिमानी पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी शिवाजी माने यांची निवड

जयसिंगपूर (प्रतिनिधी): स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्याच्या तालुकाध्यक्षपदी संतोष जाधव, तर युवा आघाडीच्या अध्यक्षपदी प्रफुल्ल मगदूम

तर

यांची बिनविरोध निवड करण्यात आली. स्वाभिमानी पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी तालुकाध्यक्षपदी शिवाजी माने यांची निवड करण्यात आली. कुरुंदवाड येथे घेण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सदर निवडीची घोषणा खासदार राजू शेट्टी यांनी केली. यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांची प्रमुख उपस्थिती होती. हातकणंगले तालुक्याची कार्यकारणी पुढील प्रमाणे – अध्यक्ष – संतोष जाधव (मुडशिंगी), उपाध्यक्ष– राजाराम देसाई (हुपरी), वैभव कांबळे (नवे पारगांव), कलगोंडा पाटील (कुंभोज), सचिव– दत्ता माणगांवकर (माणगांव), कार्यकारणी सदस्य– कुमार जगोजे (रूई), प्रसिध्दीप्रमुख – पी. डी. पाटील (वठार), अमोल चौगुले (नरंदे), भरत अलगौंडर(कुंभोज), सलिम सयद्द(माले), झाकीर देसाई (हेरले), सांगले गुरूजी(तारदाळ), राजू पाटील(टोप), शिवाजी शिंदे (घुणकी), सुनिल देसाई(भेंडवडे), ॲड. सुनिल पाटील(नेज), विनोद पाटील (मजले), राज गिड्ड(आळते), सागर चौगुले(तळदंगे).

हातकणंगले तालुका युवा आघाडी– अध्यक्ष– प्रफुल्ल मगदूम(रांगोळी), उपाध्यक्ष– राहूल पाटील (नागांव), बाबासो जोंग (माणगांव), सुभाष कांबळे(नेज), शितल मुरचिटे(रूई), सचिव– डॉ. विनय चौगुले(इंगळी), प्रसिध्दीप्रमुख– पुरंदर पाटील(कोरोची), अभय व्हनवाडे(माणगाव), राजू हावलदार(तळदंगे), कार्यकारणी सदस्य– अजित पाटील (भादोले), प्रकाश नेहरे(पट्टणकोडोली), सुरेश पाटील (तिळवणी), राजू पाटील(हालोंडी), जालधंर कोळी(कुंभोज), संदीप घोलप (दुर्गेवाडी), महावीर चौगुले(नरंदे), संतोष कांबळे(रूकडी), अमोल चौगुले(हेरले), सुशांत माळी(पट्टणकोडोली), दादासो शिखरे(मिणचे), निवास मोहिते (निलेवाडी), धीरज भोजकर(पट्टणकोडोली), शिवाजी राऊत(तळंदंगे), सचिन सारूळकर (जुने पारगांव).

स्वाभिमानी पक्ष हातकणंगले तालुका– अध्यक्ष– शिवाजी माने(भादोले), उपाध्यक्ष– शिवाजी पाटील (खोची), हणमंतराव मोहिते (जुने पारगाव), सचिव– सुनिल देसाई(भेंडवडे), रमाकांत जोशी(पट्टणकोडोली), प्रसिध्दीप्रमुख– धनाजी पाटील (सावर्डे), संपत पवार (पारगाव), विनय पाटील (आळते), भैरवना मगदूम (सावर्डे), कार्यकारणी सदस्य – हरिभाऊ जाधव (चावरे), सुधीर पाटील (नेज), महावीर कांबळे (यळगूड), रघुनाथ पाटील (रेंदाळ), प्रसिध्द सुरवते (हेरले), मांजरेकर सर(तारदाळ), सुरेश पाटील (किणी), सुधीर आवटी (पट्टणकोडोली), श्रेणीक चौगुले (इंगळी), सुरेश बागे (हातकणंगले), बापूसो पाटील (हिंगणगाव), सुभाष पाटील (हुपरी), सुभाष देवमारे (कुंभोज)

स्वाभिमानीच्या शिरोळ तालुकाध्यक्षपदी आदिनाथ हेमगिरे, तर युवा आघाडीच्या अध्यक्षपदी बाळगोंडा (बंडू) पाटील

तर पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी के. आर. चव्हाण यांची फेरनिवड

जयसिंगपूर (प्रतिनिधी): स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्याच्या शिरोळ तालुकाध्यक्षपदी ज्येष्ठ नेते आदिनाथ हेमगिरे, तर युवा आघाडीच्या अध्यक्षपदी हेरवाड येथील बाळगोंडा (बंडू) पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. स्वाभिमानी पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी के. आर. चव्हाण यांची फेरनिवड करण्यात आली. कुरुंदवाड येथे घेण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सदर निवडीची घोषणा खासदार राजू शेट्टी यांनी केली. यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांची प्रमुख उपस्थिती होती. शिरोळ तालुक्याची कार्यकारणी पुढील प्रमाणे शिरोळ तालुकाध्यक्ष आदिनाथ हेमगिरे (दत्तवाड) , उपाध्यक्ष- रामा बंडगर, मनू पुजारी (उदगांव), भिमगोंडा पाटील, (हरोली), नारायण वास्कर(गणेशवाडी), रामचंद्र फुलारे (राजापूर), सचिव- महेश पाटील (टाकळी), कार्यकारणी सदस्य- शिवाजी कांबळे (निमशिरगांव), जितेंद्र पाटील(कोथळी), बाबासाहेब कारंडे (धरणगुत्ती), हसन मुरसल (नांदणी), सागर पाटील (हसूर), संतोष पाटील (शिरटी), प्रकाश गावडे (शिरोळ), जयवंत कोले (औरवाड), बाळासाहेब कमते (घोसरवाड), पिरगोंडा पाटील (खिद्रापूर), सुकुमार पाटील (जुने दानवाड), राजू नाईक (अब्दुललाट), दिलीप पाटील (शिरढोण), सचिन काडगे (कोंडिग्रे), महावीर खिचडे (संभाजीपूर), नंदकुमार पाटील (मजरेवाडी), बाबूराव शहापुरे(शेडशाळ).

स्वाभिमानी युवा आघाडी- अध्यक्ष- बाळगोंडा (बंडू) पाटील(हेरवाड), उपाध्यक्ष- विशाल चौगुले (अकिवाट), नितीश निंबाळकर (कवठेगुलंद), प्रविण पाटील (शिरोळ), नेताजी सकपाळ (शिरोळ), संजय मोरे (चिंचवाड), सचिव- सुशांत चावरे (शिरदवाड), पोपट खोत (कुटवाड), कार्यकारणी सदस्य- पोपट कदम (अर्जुनवाड), दिग्वीजय सुर्यवंशी (तमदलगे), पिंटू महाडिक (अर्जुनवाड), संदीप पुजारी (उदगाव), महादेव पाटील (हसूर), अजित ढवळे (कनवाड), राहूल सुर्यवंशी (शिरटी), प्रभाकर बंडगर (तेरवाड), गुरुप्रसाद रिसवड (नृसिंहवाडी), सुमेर चौगुले (चिपरी), शितल पुजारी (कोथळी), अमोल पाटील (नांदणी), महावीर पाटील (नांदणी), शकील आलासे(जयसिंगपूर), प्रदीप नरदे (जयसिंगपूर), प्रशांत भबिरे (कुरुंदवाड), मनोज गुरवाण (शिरढोण).

अदिनाथ हेमगिरे के. आर. चव्हाण सौ. सरिता भवरे बाळगोंडा पाटील

स्वाभिमानी पक्ष शिरोळ तालुका- अध्यक्ष- के. आर. चव्हाण (जांभळी), उपाध्यक्ष- प्रकाश पवीट (नांदणी), सागर चिपरगे (उमळवाड), बापूसो ऐनापुरे (बुबनाळ), अमोल बिभुते (नृसिंहवाडी), मानाजीराव भोसले (दानोळी), भाऊसिंग रजपूत (अकिवाट), कार्यकारणी सदस्य- राजू घाटगे (चिंचवाड), राजू जाधव (घालवाड), कुमार हरोले (शेडशाळ), महावीर कुंभोजे (गौरवाड), मोइद्दीन पटेल (बस्तवाड), चंद्रकांत गडगे (राजापूर), अजित फरांडे (अकिवाट), महावीर पाटील (टाकळीवाडी), संजय पाटील (नवे दानवाड), मारूती चौगुले (टाकवडे), सागर मगदूम (कुरुंदवाड), प्रकाश सिदनाळे (दत्तवाड), शिवाजी गाडगीळ (शिरोळ), प्रा. सुरेश भाटीयासर (चिपरी), कुमार घडसे (लाटवाडी), सातगोंडा पाटील(जैनापूर), जिनगोंडा पाटील (कवठेसार), दादा तकडे (शेडशाळ).

स्वाभिमानी महिला आघाडी शिरोळ तालुका- अध्यक्ष- सौ. सविता भवरे (उमळवाड), उपाध्यक्ष- सौ. सुवर्णा अपराज (हेरवाड), सौ. डॉ. संध्या पाटील (जांभळी), राजश्री चौगुले (अर्जुनवाड), सौ. भारती पाटील (जयसिंगपूर), सौ. अनिता पाटील (जयसिंगपूर), सौ. सुनंदा दानोळे(आलास), सौ. सिमा पाटील (टाकळी), सौ. निता परिट (नांदणी), श्रीमती अनंतमती पाटील (कोथळी), सौ. अनिता माने (शिरोळ), सौ. शिला पाटील (शिरढोण), सौ. सुवर्णा देवताळे (गणेशवाडी), सौ. वंदना गावडे (शिरोळ), सौ. सुजाता सुतार (दत्तवाड), सौ. वैशाली मोरे (जयसिंगपूर), सुवर्णा देवकाते (नांदणी), सौ. जमेला नदाफ (उदगाव), सौ. उज्वला शेट्टी(जयसिंगपूर), सौ. सुरेखा पाटील (चिंचवाड), सौ. डॉ. वर्षा अक्कोळे (जयसिंगपूर).

सामान्यांसाठी बलिदानाची तयारी : सदाभाऊ खोत

शिराळा : सर्वसामांन्यांच्या पोरासाठी वेळप्रसंगी बलिदानाचीही तयारी असल्याने पोलिसांनी माझ्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याची मला परवा नसल्याचे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले.

यावेळी खोत म्हणाले, ''वीस टक्के ग्रामीण भागातील वाडी-वस्तींवर एसटी बसची सोय नाही. ६० टक्के गावात दिवसातून फ क्त दोन वेळा गाडी जाते, अशी अवस्था असताना गोरगरिबांची व शेतकऱ्यांची पोरं प्रवासी वाहतूक करीत आहेत. अशी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांच्या पाठीशी क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी होते. आता आम्ही खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली याच शेतकऱ्यांच्या पोरांच्या पाठीशी ठाम आहोत. वाडी-वस्तीवर एसटी सुविधा नाही. त्यामुळे त्या ठिकाणी एखादा दु:खद प्रसंग घडला, आजारी माणसांना दवाखान्यात न्यावे लागले तर हेच प्रवासी वाहतूकदार रात्री-अपरात्री आगाऊ सेवा देतात. रेल्वेत लोक लोंबकळत असतात. एसटीमध्ये जादा प्रवासी असतात. त्यांच्यावर शासनाकडून कारवाई केली जात नाही. परंतु प्राणिकपणे लोकांना रात्री-अपरात्री सेवा देणाऱ्यांना त्रास दिला जातो. राज्यात पाच लाख प्रवासी वाहतूक करणारे बेरोजगार आहेत. ते संघटित नसल्याने त्यांना आम्ही संघटित करणार आहोत. २० ऑगस्टपर्यंत मराठवाडा व विदर्भ आणि त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात या लोकांना संघटित करण्यासाठी व त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फ ोडण्यासाठी दौरा करणार आहे. आम्ही प्रवासी वाहतूकदारांच्या हाती घेतलेल्या लढ्याला यशस्वी केल्याशिवाय राहणार नाही. ही आमची लढाई आर या पार असणार आहे. त्यामुळे माझ्यावर गोरगरिबांच्या न्याय हक्कासाठी आणखी गुन्हे दाखल झाले तरी मला त्याची परवा नाही. त्यांच्यासाठी वेळप्रसंगी बलिदान देण्याची तयारी आमच्या संघटनेची आहे.''

स्वाभिमानी संघटनाच प्रस्थापितांना पर्याय

खासदार राजू शेट्टी : शाहूवाडी तालुक्यात संपर्क दौरा

वारणा कापशी : प्रस्थापितांना पर्याय निर्माण करण्याच्या मूळ उद्देशानेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या व स्वाभिमानी पक्षाच्या शाखांचे जाळे सर्वत्र तयार करण्यात येत आहे. या शाखा सर्वसामान्यांना आधारवड व धनदांडग्यांना जरब बसविण्याचे काम निश्चितपणे करतील, असा विश्वास खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केला. शाहूवाडी तालुक्याच्या पूर्व भागातील गावांचा दौरा केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. या दौऱ्यात त्यांचे गावोगावी उत्स्फू र्तपणे स्वागत झाले.

सर्वसामान्यांना ताकत देण्याचे काम आपली संघटना करणार असून, शेतमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी अथकपणे प्रयत्न करत असल्याचे सांगून ते म्हणाले, ''शेतकऱ्यांनी माल घेताना तो जादा दराने घ्यावा व त्याने पिकविलेल्या मालाचा लिलाव करून खरेदीदाराने त्याचा दर ठरवावा. या प्रचलित व्यवस्थेविरुद्ध आपण तीव्र लढा उभारणार आहे. रासायनिक खतांचे दर तिपटीने वाढले आहेत; मात्र शेतमालाची किंमत वाढू शकत नाही. ही बाब आपण कृषिमूल्य आयोगाच्या लक्षात आणून दिली.''

ते म्हणाले, ''शेतकरीवर्गाची संघटित शक्ती शासनाच्या हळूहळू लक्षात येऊ लागली आहे. हे या चळवळीचे यश आहे. आणखी दोन वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत आपण गतवेळच्या म ताधिक्यापेक्षाही अधिक मतांनी निवडून येऊ. हे यश सर्वसामान्यांच्या पाठबळाचे असेल. माझे जेवढे वय आहे, तितकी राजकीय कारकीर्द भोगलेल्या उमेदवारांची सध्या चर्चा सुरू आहे; मात्र निवडणूक रिंगणात कुणीही असो; धन-दांडग्यांच्या नव्हे तर सर्वसामान्यांच्या समर्थ पाठिंब्यावर आपला विजय निश्चित आहे.''

जयसिंगपूर : श्री भरत अर्बन को-ऑप. बँकेच्या वार्षिक सभेत माहिती देताना अध्यक्ष विठ्ठल मोरे. व्यासपीठावर खासदार राजू शेट्टी, सावकर मादनाईक आदी.

भरत बँकेने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक कर्ज द्यावे

खासदार शेट्टी : भरत अर्बन बँकेची वार्षिक सभा खेळीमेळीत

जयसिंगपूर : श्री भरत अर्बन को-ऑप. बँकेने सर्वसामान्य सभासदांच्या हिताच्या दृष्टीने केलेले कार्य आदर्शवत आहे. व्यवसाय वाढविण्याबरोबरच बँकेने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक कर्ज योजना जाहीर करावी व सुलभ वित्तपुरवठा करावा, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

येथील श्री भरत अर्बन को-ऑप. बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भिर्डी सभागृहात खेळीमेळीत पार पडली. सर्व विषयांना सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली.

बँकेचे अध्यक्ष विठ्ठल मोरे म्हणाले, ''उत्तम नियोजन व कौशल्याचा वापर, पारदर्शक कारभार यामुळे बँकेने सभासदांचा विश्वास संपादन केला आहे. बँकेस ऑडिट वर्ग 'अ' मिळाले असून, ठेवींमध्ये ७ कोटी ७५ लाखांहून वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात ३४ कोटी ७३ लाखांवर कर्जे दिली गेली आहेत. बँकेचा एनपीए १.२४ टक्के व थकबाकी २.५० टक्के आहे. निव्वळ नफा २४ लाख ७३ हजार रुपये झाला आहे.'' सभासदांना ८ टक्के लाभांश देण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

संचालक डॉ. श्रीवर्धन पाटील यांनी शंभर कोटींपर्यंत ठेवी असणाऱ्या अर्बन बँकांना प्राप्तिकराम धूलन मुक्त करावे. ही बाब खासदार शेट्टी यांनी लोकसभेत मांडावी, अशी मागणी केली.

संस्थापक संचालक डॉ. जे. जे. मगदूम यांच्या हस्ते खासदार शेट्टी, जिल्हा परिषद बांधकाम समिती सभापती सावकर मादनाईक, 'स्वाभिमानी'चे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, उपाध्यक्ष उल्हास पाटील यांचा सत्कार झाला. गुणवंत विद्यार्थ्यांचा खासदार शेट्टी यांच्या हस्ते सत्कार झाला. या वेळी उपाध्यक्ष अशोक रुणवाल, संचालिका श्रीमती अलका कुंभोजकर, श्रीमती विमल पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. संचालक प्रसन्न कुंभोजकर यांनी आभार मानले.

पुढाऱ्यांच्या घरात पुढारीच का जन्मतात?

शरद पवारांची घराणेशाही सुरू झाली आहे. मुलगी खासदार, पुतण्या आमदार नंतर मंत्री आता माजी मंत्री. हे काही एकट्या शरद पवारांचे नाही. भाजपाच्या गोपीनाथ मुंडेंचे काय? त्यांची मुलगी विधानसभेत, पुतण्या विधान परिषदेत. तुम्ही कोणत्याही जिल्ह्यात जाऊन पहा. प्रत्येक ठिकाणी कमी अधिक प्रमाणात असेच दिसेल. नेहरू घराण्याचा हा आदर्श आहे. पंडित नेहरू, त्यांची मुलगी, मुलीचा मुलगा, मुलाची बायको आता मुलगा. पुढे प्रियंका किंवा तिची मुले येतीलच. नेहरू घराण्यावर टीका करणाऱ्या मुलायमसिंगांनी तरी काय केले? पुत्राला उत्तर प्रदेशाची गादी सोपवून उत्तराधिकारी बनविले. देशभर असेच चित्र आहे. पूर्वी या पुढाऱ्यांना विरोधी पक्ष विरोध करायचा. आता तेही संपले. घरातल्या घरात विरोध सुरू झाला. चुलता-पुतण्या. भाऊ-भाऊ, भांडणे सुरू झाली. सत्ता पालटली तरी ती त्यांच्याच घरातच राहणार. बाकीच्यांनी टकामका बघतङ्गयाचे चुकले की त्याचेफ याचीच फक्त चर्चा करायची. सत्तेच्या ताटावर ते बसणार. बाकीचे सगळे बघे !

भारतीय लोकशाहीत ही घराणेशाही का आली? कशी आली? एकेकाळी गावगाड्यात बलुतेदारी पद्धत होती. इंग्रज आले आणि ती पद्धत संपुष्टात आली. इंग्रज गेल्यानंतर आपल्या देशाने लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारली. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. आखाड्यात पैलवान उतरतात तसे नवे नवे लोक राजकारणात उतरले. त्यांनी पदे भूषविली. सत्ता हे सेवेचे साधन नसून मेवा खाण्याचे आहे, हे ओळखायला वेळ लागला नाही. एकदा वाघाने माणसाचे रक्त चाखले की त्याला चटक लागते असे म्हणतात, त्याचप्रमाणे सत्ता ङ्गभोगफलेल्यांना सत्ता सोडवत नाही. सत्ता कायम आपल्या ताब्यात राहवी, या इच्छेने नवी बलुतेदारी अस्तित्वात आली. बाप आमदार झाला की बेटाही वारसदार म्हणून पुढे येणारच. अशाप्रकारे राजकीय घराणी जन्माला आली.

बलुते वर्षाचे असायचे. गावचा सुतार वर्षाला एकदा येऊन एक पोतेभर धान्य घेऊन जायचा. राजकीय बलुतेदारी पाच वर्षांची असते. हे बलुतेदार पाच वर्षांनी एकदा येतात. त्यांना बलुत्यात मत लागते ! आपण एकदा ते दिले की पाच वर्षे ते आपल्याकडे फिरकत नाहीत. सुताराचा मुलगा जसे सुतार काम करायचा, तशाच प्रकारे पुढाऱ्याचा पोरगा पुढारी होणार हे ठरलेले. बलुतेदारी जशी परंपरेने चालायची तशीच राजकीय बलुतेदारी देखील परंपरेने चालते.

अमेरिकेचा अध्यक्ष दोन टर्म पेक्षा अधिक काळ पदावर राहू शकत नाही, असा कायदा आपल्याकडे नाही. होण्याची शक्यताही नाही. कोणी कितीही वर्षे सत्तेत राहू शकतो. मरेपर्यंत सत्तेत राहायचे. जाताना पोराला वा पुतण्याकडे सोपवून डोळे मिटायचे.

सत्तेचा एवढा मोह का असतो? पिढ्यान्‌पिढ्या ती हवीशी का वाटते? याचे साधे उत्तर आहे, सत्तेच्या द्वारे अधिकार आणि अधिकारात संपत्ती मिळते. मुळात सत्तेचा मोह कोणालाही नाही, संपत्तीचा मोह मात्र अती आहे. संपत्तीचा मोह भागविण्यासाठी सत्ता हवी असते. सत्ता हे सेवेचे साधन नसून ते भोगाचे साधन झाल्यामुळे त्यात घराणेशाही सुरु झाली आहे.

लोक विचारतात, काहो, महात्मा गांधी, एसएम जोशी यांची मुले राजकारणात का आली नाहीत? याचे साधे उत्तर असे की, या लोकांनी सत्तेकडे भोगाचे साधन म्हणून पाहिले नाही. ते आयुष्यभर जळत्या निखाऱ्यावरून चालले. त्यांच्या मुलांनी त्यांच्या कुटुंबाची होरपळ अनुभवली. राजकारण म्हणजे चैन नसून त्याग आहे. असे निखाऱ्यांवरुन चालने कठीण आहे म्हणून या महात्म्यांची मुले राजकारणात आली नाहीत. पुढाऱ्यांनी चोऱ्या केल्या. चोरीच्या संपत्तीवर चैन-शौक करता येतात, हे या मुलांनी लहानपणापासून पाहिले त्यामुळे त्यांची मुले राजकारणाकडे खेचली गेली. चोराचा मुलगा चोर होतो. पण साधू संन्याशाचा संन्यासी होत नाही. असे म्हणतात ते खोटे नाही.

अनेक पाश्चात्य देशात आधी व्यापार खुला झाला. नंतर लोकशाही आली. आपल्या देशात नेमके उलटे झाले. आधी लोकशाही राज्यव्यवस्था आली आणि आता कोठे हळूहळू बाजार खुला होतो आहे. व्यापार खुला नसल्यामुळे अर्थव्यवहारावर सत्तेचा कब्जा राहिला. सत्तेच्या शिंक्यावर संपत्तीचा लोण्याचा गोळा असल्यामुळे, तो गोळा गट्टम करण्यासाठी बोके त्याच्या अवतीभोवती येणे अगदी स्वाभाविक आहे. एकेकाळी ज्या लोकसभा, विधानसभांमध्ये स्वातंत्र्यसैनिक दिसायचे त्याच सभागृहांमध्ये

पान ९ वर ▶

पुढाऱ्यांच्या घरात पुढारीच का जन्मतात?

शरद पवारांची घराणेशाही सुरू झाली आहे. मुलगी खासदार, पुतण्या आमदार नंतर मंत्री आता माजी मंत्री. हे काही एकट्या शरद पवारांचे नाही. भाजपाच्या गोपीनाथ मुंडेंचे काय? त्यांची मुलगी विधानसभेत, पुतण्या विधान परिषदेत. तुम्ही कोणत्याही जिल्ह्यात जाऊन पहा. प्रत्येक ठिकाणी कमी अधिक प्रमाणात असेच दिसेल. नेहरू घराण्याचा हा आदर्श आहे. पंडित नेहरू, त्यांची मुलगी, मुलीचा मुलगा, मुलाची बायको आता मुलगा. पुढे प्रियंका किंवा तिची मुले येतीलच. नेहरू घराण्यावर टीका करणाऱ्या मुलायमसिंगांनी तरी काय केले? पुत्राला उत्तर प्रदेशाची गादी सोपवून उत्तराधिकारी बनविले. देशभर असेच चित्र आहे. पूर्वी या पुढाऱ्यांना विरोधी पक्ष विरोध करायचा. आता तेही संपले. घरातल्या घरात विरोध सुरू झाला. चुलता-पुतण्या. भाऊ-भाऊ, भांडणे सुरू झाली. सत्ता पालटली तरी ती त्यांच्याच घरातच राहणार. बाकीच्यांनी टकामका बघतङ्गयाचे चुकले की त्याचेफ याचीच फक्त चर्चा करायची. सत्तेच्या ताटावर ते बसणार. बाकीचे सगळे बघे !

भारतीय लोकशाहीत ही घराणेशाही का आली? कशी आली? एकेकाळी गावगाड्यात बलुतेदारी पद्धत होती. इंग्रज आले आणि ती पद्धत संपुष्टात आली. इंग्रज गेल्यानंतर आपल्या देशाने लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारली. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. आखाड्यात पैलवान उतरतात तसे नवे नवे लोक राजकारणात उतरले. त्यांनी पदे भूषविली. सत्ता हे सेवेचे साधन नसून मेवा खाण्याचे आहे, हे ओळखायला वेळ लागला नाही. एकदा वाघाने माणसाचे रक्त चाखले की त्याला चटक लागते असे म्हणतात, त्याचप्रमाणे सत्ता ङ्गभोगफलेल्यांना सत्ता सोडवत नाही. सत्ता कायम आपल्या ताब्यात राहवी, या इच्छेने नवी बलुतेदारी अस्तित्वात आली. बाप आमदार झाला की बेटाही वारसदार म्हणून पुढे येणारच. अशाप्रकारे राजकीय घराणी जन्माला आली.

बलुते वर्षाचे असायचे. गावचा सुतार वर्षाला एकदा येऊन एक पोतेभर धान्य घेऊन जायचा. राजकीय बलुतेदारी पाच वर्षांची असते. हे बलुतेदार पाच वर्षांनी एकदा येतात. त्यांना बलुत्यात मत लागते ! आपण एकदा ते दिले की पाच वर्षे ते आपल्याकडे फिरकत नाहीत. सुताराचा मुलगा जसे सुतार काम करायचा, तशाच प्रकारे पुढाऱ्याचा पोरगा पुढारी होणार हे ठरलेले. बलुतेदारी जशी परंपरेने चालायची तशीच राजकीय बलुतेदारी देखील परंपरेने चालते.

अमेरिकेचा अध्यक्ष दोन टर्म पेक्षा अधिक काळ पदावर राहू शकत नाही, असा कायदा आपल्याकडे नाही. होण्याची शक्यताही नाही. कोणी कितीही वर्षे सत्तेत राहू शकतो. मरेपर्यंत सत्तेत राहायचे. जाताना पोराला वा पुतण्याकडे सोपवून डोळे मिटायचे.

सत्तेचा एवढा मोह का असतो? पिढ्यान्‌पिढ्या ती हवीशी का वाटते? याचे साधे उत्तर आहे, सत्तेच्या द्वारे अधिकार आणि अधिकारात संपत्ती मिळते. मुळात सत्तेचा मोह कोणालाही नाही, संपत्तीचा मोह मात्र अती आहे. संपत्तीचा मोह भागविण्यासाठी सत्ता हवी असते. सत्ता हे सेवेचे साधन नसून ते भोगाचे साधन झाल्यामुळे त्यात घराणेशाही सुरु झाली आहे.

लोक विचारतात, काहो, महात्मा गांधी, एसएम जोशी यांची मुले राजकारणात का आली नाहीत? याचे साधे उत्तर असे की, या लोकांनी सत्तेकडे भोगाचे साधन म्हणून पाहिले नाही. ते आयुष्यभर जळत्या निखाऱ्यावरून चालले. त्यांच्या मुलांनी त्यांच्या कुटुंबाची होरपळ अनुभवली. राजकारण म्हणजे चैन नसून त्याग आहे. असे निखाऱ्यांवरुन चालने कठीण आहे म्हणून या महात्म्यांची मुले राजकारणात आली नाहीत. पुढाऱ्यांनी चोऱ्या केल्या. चोरीच्या संपत्तीवर चैन-शौक करता येतात, हे या मुलांनी लहानपणापासून पाहिले त्यामुळे त्यांची मुले राजकारणाकडे खेचली गेली. चोराचा मुलगा चोर होतो. पण साधू संन्याशाचा संन्यासी होत नाही. असे म्हणतात ते खोटे नाही.

अनेक पाश्चात्य देशात आधी व्यापार खुला झाला. नंतर लोकशाही आली. आपल्या देशात नेमके उलटे झाले. आधी लोकशाही राज्यव्यवस्था आली आणि आता कोठे हळूहळू बाजार खुला होतो आहे. व्यापार खुला नसल्यामुळे अर्थव्यवहारावर सत्तेचा कब्जा राहिला. सत्तेच्या शिंक्यावर संपत्तीचा लोण्याचा गोळा असल्यामुळे, तो गोळा गट्टम करण्यासाठी बोके त्याच्या अवतीभोवती येणे अगदी स्वाभाविक आहे. एकेकाळी ज्या लोकसभा, विधानसभांमध्ये स्वातंत्र्यसैनिक दिसायचे त्याच सभागृहांमध्ये

पान ९ वर ▶

पुढाऱ्यांच्या घरात पुढारीच का जन्मतात?

▶ पान ८ वरुन

आता गुन्हेगार वावरताना दिसतात. जोपर्यंत सत्तेच्या शिंक्यावर संपत्तीचा लोण्याचा गोळा राहील, तोपर्यंत या बोक्यांना आवरणे शक्य नाही. लोण्याचा गोळा गट्टम करण्यासाठी त्यांना धार्मिक शिडी उपयोगी पडणार असेल तर ते कट्टर धार्मिक होतील. त्यांना जर सेक्युलर शिडी उपयोगाची वाटली तर ते तीही शिडी घेऊन लोण्याच्या गोळ्यापर्यंत पोचण्याचा प्रयत्न करतील. राजकीय पक्षांचा धोरणांशी तलाक झाली असून त्यांचे रुपांतर सत्ताकांक्षी टोळ्यात झाले आहे.

मागस भागात प्रगतीच्या संधी नसतात. असल्यातरी फार थोड्या. अशा वेळेस राजकारणाचा पर्याय अनेकांना बरा वाटतो. राजकीय पुढाऱ्यांची जी बजबजपुरी माजली आहे ती याच बाबीचा परिणाम आहे. ङ्गमागता येईना भीक, तर पुढारपण शीकफ असे म्हटले जाते. पुढारपण हा बिनभांडवली धंदा. सुरुवातीला खालच्यांशी अरेरावी व बलिष्टांपुढे लाचारी करता आली पाहिजे. नंबर दोनचा धंदा करीत असाल तर उत्तम. नात्यागोत्याचे वर्तुळ मोठे असणे पुरक. लोकांना मुर्ख बनविण्याची कला तेवढी अंगभूत असली पाहिजे. हळूहळू जम बसत जातो.

हल्ली बांधकाम करणे म्हणजे विकास करणे मानले जाते. मागस भागाच्या विकासासाठी अनेक बांधकामे चाललेली असतात. त्यात अनेक गुत्तेदार गुंतलेले असतात. यापैकी अनेकजण पुढाऱ्याच्या मुलाच्या नावाने काम करीत असतात. काही ठिकाणी पुढाऱ्याचा मुलगा आपले नाव वापरत नाही पण हा चमचा पुढारी गुत्तेदार एखाद्या चाकरासारखा काम करतो. बहुतेक उदयोन्मुख पुढारी गुत्तेदारी करताना आढळतात.

इंजिनियर होऊन एखादी इंडस्ट्री टाकण्या पेक्षा बापाच्या आमदारकीचा लाभ घेऊन सहकारी संस्था काढणे केव्हाही आर्थिकदृष्ट्या परवडते. खाजगी कारखान्यात फटका बसला तर तो स्वत:ला बसतो. सहकारी संस्था बुडाली तरी बापाचे काहीच जात नाही. संस्था काढली की, लोकसंपर्क वाढतो आणि पुढारी होण्याचा मार्ग मोकळा होतो.

निवडणूक प्रक्रीया खूप खर्चिक झाली आहे. निवडणूकीतील खर्च कोणाच्या हाताने करायचा? एकटा उमेदवार सगळा व्यवहार करू शकत नाही. करायला लागला तर पकडला जाऊ शकतो. अशा वेळेस भरोश्याचा माणूस लागतो. राजकारणात कोणीच कोणावर भरोसा ठेवित नसतो. त्यासाठी हवा असतो घरचा माणूस. हे काम भाऊ, मुलगा, पुतण्या, असाच कोणी तरी नातेवाईक करतो. पैसे वाटण्याचे ट्रेनिंग झाले की तोही राजकारणात उतरायला पात्र ठरतो. बापाची निवडणूक होते, मुलाचे प्रशिक्षण. दोघांचे काम भागते. निवडणूकीतील अमाप खर्च हे देखील घराणेशाही निर्माण करण्याचे एक प्रमुख कारण आहे.

पुढाऱ्यांच्या पोरांमध्ये नेतृत्वाचे उपजत गुण आभावानेच आढळतात. बुद्धीमत्तेच्या बाबतीत तर बोंबाबोब. बाप पुढारी नसता किंवा बापाची शिक्षण संस्था नसती तर बहुतेक जण १० वी पास झाले नसते. आता तेच एल.एल.बी. किंवा एम.बी.ए. झालेले दिसतात. या निव्वळ ङ्गढफ असलेल्या पोरांना राजकारणात स्थान मिळावे यासाठी नाना लटपटी-खटपटी केल्या जातात. शासकीय समित्यांवरील नेमणूक हा त्यातलाच एक प्रकार आहे. समाजात अनेक गुणवंत लोक असताना या पोरांना ही संधी दिली जाते. अनेकदा वाढदिवसासारखे कार्यक्रम घडवून आणून या पोरांना चमकण्याची संधी दिली जाते. हल्ली डिजीटल बोर्डावर याच पोरांची थोबाडे प्रदर्शित केली जातात.

अगामी दहा वर्षात किती परिस्थिती बदलेल हे सांगता येणार नाही परंतु जगात जे वारे वाहते आहे त्याचा अंदाज घेतला तर असे वाटते की, या 'भुरट्या' पुढाऱ्यांचे दिवस आता भरत आले आहेत. राज्य आणि राष्ट्रीय राजकारणातील कचराभरती कमी होईल. अलीकडच्या काळात वस्तुंच्या उत्पादना बाबत जसे आपण आंतरराष्ट्रीय मानक लावायला लागलो, जसे साहित्याच्या बाबतीत विश्वस्तरीय दर्जाची अपेक्षा करू लागलो, अगदी त्याच पद्धतीने नेतृत्वाची सुद्धा कसोटी लागणार आहे.तसे झाले तर वावटळ शांत होताना जसा पालापाचोळा जमिनीवर पडू लागतो अगदी तसेच पुढाऱ्यांची पोरं राजकारणातून बाहेर फेकली जातील. इंग्रजांच्या आगमनानंतर गावगाड्यातली बलुतेदारी संपुष्टात आली तशीच आंतरराष्ट्रीय बदलांमुळे राजकारणातली बलुतेदारी संपुष्टात येणार आहे. माझा बाप पुढारी म्हणून मी ही पुढारी, हा गबाळग्रंथी मंत्र कालबाह्य होणारच आहे. प्रश्न एवढाच आहे की, तो लवकर व्हावा यासाठी आपण काही करणार आहोत का?

●अमर हबीब
मो. ९४२२९३१९८६
email : habib.amar@gmail.com

आमदार विनय कोरे यांना निवेदन देताना भगवान काटे, अण्णासो चौगुले आदी.

गणेशोत्सवापूर्वी ५०० रुपये उचल द्या

'स्वाभिमानी'चे निवेदन : दिवाळीसाठी प्रतिटन २०० रुपये जाहीर : आमदार कोरे

वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याने गणेशोत्सवापूर्वी ५०० रुपये उचल द्यावी, या मागणीचे निवेदन वारणा समूहाचे नेते आमदार विनय कोरे यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले. दरम्यान, दीपावलीसाठी प्रतिटन २०० रुपये उचल यापूर्वीच जाहीर केल्याचे वारणा समूहाचे नेते आमदार कोरे यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

कुरुंदवाड येथे 'स्वाभिमानी'च्या १९ ऑगस्टला झालेल्या मेळाव्यात खासदार राजू शेट्टी यांनी हंगाम चालू करण्यापूर्वी ५०० रुपये उचल द्यावी, अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे गणेशचतुर्थीपूर्वी उचल द्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निवदेनाद्वारे केली असून, याबाबतचे निवेदन त्यांनी आमदार विनय कोरे यांना दिले.

आमदार विनय कोरे व संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे यांच्यात चर्चा झाली. साखरेस मिळणारे दर, राज्यातील कारखान्यांशी ऊसदराबाबत चर्चा करून तसेच संचालक मंडळाशी चर्चा करून उचलीबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन आमदार कोरे यांनी दिल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

शिष्टमंडळात जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती अनिल मादनाईक, पंचायत समितीचे सभापती युनूस पटेल, संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, उपाध्यक्ष उल्हास पाटील, हातकणंगले तालुकाध्यक्ष शिवाजी माने, शिवाजी शिंदे (घुणकी) संपत पोवार, हणमंत मोहिते, बाळासाहेब मोरे, सदाशिव बोने-पाटील (पारगाव), अण्णासाहेब चौगुले, आदिनाथ हेमगिरे, महेश पाटील, महादेव धनवडे, जयकुमार कोले, के. आर. चव्हाण, रमेश भोजकर, रामचंद्र फु लारे, संतोष जाधव, विष्णुल मोरे, अण्णासाहेब जोंग यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

दुग्ध व्यवसाय मार्गदर्शन

सध्या दुधाळ जनावरांच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झालेली असून आपणास बाजारातून चांगले दुधाळ जनावर मिळेल याची खात्री राहिलेली नाही. बाजारातून जनावर खरेदी केल्यास आपणाला त्या जनावराबद्दल तसेच त्याच्या मागील पिढ्याबद्दल पुरेशी माहिती असत नाही. कोणताही शेतकरी अथवा दूध उत्पादक आपल्याकडील चांगले जनावर बाजारात विक्रीसाठी नेत नाही. जनावर खरेदीच करावयाचे असल्यास बाजारातून खरेदी न करता घरगुती खात्रीने माहितीगार माणसाकडून खरेदी करावे. आपल्या गोठ्यातील जनावर हे आपण स्वतः गोठ्यातच तयार केले पाहिजे. म्हणजे आपणास खात्रीशीर आणि आपल्या वातावरणात तयार झालेले जनावर मिळेल.

आपणाकडे अजूनही जनावरांच्या संगोपनाबद्दल पुरेशी जागृती झालेली नाही. आपण अजूनही पूर्वीप्रमाणे शेतामध्ये मुख्य पीक काढून राहिलेला पालापाचोळा शेतातील तण इत्यादी गोष्टी वैरण म्हणून जनावरास खाऊ घालतो. आणि त्या बदल्यात जास्त दूध उत्पादनाची अपेक्षा करतो. परंतु ज्या प्रमाणात आवश्यक पोषणमूल्य त्या जनावरास खाद्य अथवा वैरणीतून मिळणे अपेक्षित असते. त्या प्रमाणात ती मिळत नाही. आणि अपेक्षित दूध उत्पादन मिळत नाही. म्हणून चिंता करत बसतो. जरा स्वतःलाच प्रश्न करून बघा आपणांपैकी किती लोकांनी आपल्या जमिनीपैकी किती क्षेत्र वैरण पिकासाठी राखून ठेवले आहे आणि राखून ठेवले असल्यास किती क्षेत्र किती जनावरांसाठी? असो

मला इथे आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे, कुठलाही व्यवसाय सुरू करीत असताना त्या व्यवसायाबद्दलचे पुरेशे शास्त्रीय ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे जरूरीचे आहे. दुर्दैवाने आपल्याकडे अशा प्रकारचे शिक्षण शेतकऱ्यांना देणाऱ्या संस्था कार्यरत नाहीत. पर्यायाने शेतकरी आपल्याकडच्या पारंपारिक ज्ञानाआधारे हा दुग्ध व्यवसाय आधुनिक प्रकारे करण्याचा प्रयत्न करीत आहे. असे करणे म्हणजे जुन्या जमान्यातील शस्त्रांच्या आधारे आधुनिक लढाया होय. परतु त्यात त्याचा टिकाव लागणे कठिण आहे. याचा अर्थ असाही नव्हे कि, पूर्वीचे ज्ञान सर्व खोटे, चुकीचे अशास्त्रीय आहे. कारण जे ते ज्ञान व जे ते शास्त्र त्या त्या काळात योग्य असते. परिस्थिती बदलेल त्याप्रमाणे त्यात बदल होत असतात. याप्रमाणे आपणही काळाप्रमाणे बदलेले पाहिजे. म्हणजेच नवीन ज्ञान, कला, कौशल्य आत्मसात केली पाहिजेत आणि त्याचा वापर करून आधुनिक दूध व्यवसाय केला पाहिजे.

उदाहरण द्यावयाचे झाल्यास, पूर्वी आपल्याकडील तुलनेने कमी दूध देणारी देशी जनावरे दिवसा गोठ्याबाहेर चरायला सोडायची. त्यामुळे त्यांना पुरेशा शारिरीक व्यायाम मिळायचा, चालल्यामुळे खुरांची योग्य प्रमाणात झीज व्हायची, साध्यांची पुरेशी हालचाल व्हायची. त्यामुळे एकंदर जनावरांचे आरोग्य खूपच चांगले असायचे, सध्या मात्र जनावर बाजारातून केल्या दिवसापासून अथवा गोठ्यात जन्मल्यापासून मरे पर्यंत एकाच गोठ्यात एकाच जागेवर असते. पर्यायाने अशा जनावरांचे आरोग्य व्यवस्थित राहू शकत नाही. आणि अशा जनावरांना मग खुरांचे आजार, दगडी (स्तनदाह), कातडी आजार, निमोनिय सारखे आजार संभवतात आणि एकूणच असा जनावरांची रोग प्रतिकार शक्ती कमी होते.

आधुनिक दुग्ध व्यवसाय करीत असताना प्रथम आपण त्याच्या विविध अंगाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे गरजेचे आहे. मग ही अंगे कोणती? आधुनिक दुग्ध व्यवसायामध्ये गोठा व्यवस्थापन, जनावरांची निवड, जनावर संगोपन, वैरण व खाद्य व्यवस्थापन, प्रजनन व्यवस्थापन, गूध काढणे, दूध विक्री करणे, इ. गोष्टींचा सखोल अभ्यास करणे अपेक्षित आहे. स्वाभिमानी पाक्षिकातील सदर लेखमालेमध्ये प्रत्येक सदरात आपण दुग्ध व्यवस्थापनाच्या विविध अंगाच्या शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करणार आहोत. स्वाभिमानी पाक्षिकाच्या पुढील अंकात आपण प्रथमता दुधाळ म्हैशीचे व्यवस्थापन या विषयी सविस्तर माहिती घेणार आहोत.

–डॉ. जितेंद्र लेंभे,
पशुवैद्यकिय अधिकारी, स्वाभिमानी दूध

कायद्याची सोपी मांडणी

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व मुलुख मैदान तोफ सदाभाऊ खोत यांनी या शिबिराचा उद्देश मांडताना सांगितले की, स्वाभिमानी शेतकरी संघटना ऊस, कापूस, दूध, कांदा, बेदाणा या प्रश्नांवर गेल्या अनेक वर्षापासून करीत असलेल्या आंदोलनातून राज्यकर्त्या वर्गाला वेळोवेळी सावध करण्याचा प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्याच्या कष्टावर उभी असलेली ही व्यवस्था दुर्दैवाने शेतकऱ्याच्या पदरात काहीच टाकत नाही. दीड वर्षापूर्वी या संघटनेने पाण्याचा गैरवापर आणि त्यातील हितसंबंध उघडकीला आणून पाणी प्रश्नावर व्यापक लढा उभा केला होता. सद्यस्थितीत पाणी प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केल्याचे दिसून येते. गावगाड्यातील अशिक्षित शेतकऱ्याला सरकारची शेती विषयक धोरणे सहज समजतील अशा सोप्या भाषेत सांगून त्यांच्यात जागृती निर्माण करणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. आसूड मेळावा, पंढरपूर ते बारामती पायी पदयात्रा, नाशिक मधील कांदा आंदोलन, विदर्भ आणि मराठवाड्यातील कापूस आंदोलन या राज्यव्यापी आंदोलनातून संघटनेला व्यापक असा लोकांचा सहभाग लाभला कारण स्वाभिमानी शेतकरी संघचना व संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्यावरील जनतेच्या विश्वातून आंदोलनाने मोठा पल्ला गाठला. परिणामी राज्यकर्त्या वर्गाला त्यांची दखल घ्यावी लागली.

संघटना प पक्ष बांधणी कशी असावी?

भविष्यात महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून संघटन व पक्ष बांधणीसाठी अनेक महत्वाच्या सूचना या शिबिराला उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी मांडल्या. संघटना व पक्ष हा सर्वसमावेशक असला पाहिजे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, दलित, महिला यांच्या प्रश्नांवर आंदोलन उभे करून त्यांना संघटनेशी कसे जोडता येईल यासाठी शेतकरी आघाडी, दलित आघाडी, ओबीसी आघाडी, महिला आघाडी, युवक आघाडी निर्माण करणे गरजेचे आहे. या बरोबरच शहरातील कष्टकरी वर्ग युवक, महिला, सुशिक्षित मध्यम वर्ग यांचे प्रश्न नेमके काय आहेत? यावर अभ्यास करून त्यांना संघटनेशी जोडले जाईल. कोणत्याही प्रश्नावर आंदोलन करताना त्यात लवचिकता असणे महत्वाचे आहे. संघटन बांधणी प्रत्येक सदस्य महत्वाचा असतो. त्यामुळे आंदोलन हे सर्वांना जोडून करणे आवश्यक आहे. केवळ प्रत्येक वेळी आंदोलन न करता त्यास पर्याय म्हणून काही गोष्टी स्वीकारण्याची आवश्यकता आहे. गाव, तालुका, जिल्हा, राज्य या प्रत्येक ठिकाणाचे मुद्दे हे वेगवेगळे असतात. हे मुद्दे शोधून त्यावर आंदोलन झाले पाहिजे. संघटनेसाठी तालुका कार्यकारणी, जिल्हा कार्यकारणी व त्यातून राज्याची कार्यकारणी निर्माण व्हावी. स्वाभिमानी शेतकरी संघटना ही सुरूवातीपासूनच लघु, लहान, सीमांत शेतकऱ्यांसाठी बनली आहे. न हेच ते प्रमुख गुणवैशिष्ट्य राहिले आहे. त्यामुळे संघटनेत या लोकांचे प्रतिनिधित्व करणे आवश्यक आहे. शहरात राहणाऱ्या लोकांमध्ये संघटन पोहचविण्यासाठी नवीन गृहनिर्माण सोसायटीमध्ये स्वाभिमानी सोसायटी, कॉलनी व मंडळे असावीत. तेथील लोकांना येणाऱ्या अडचणी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सोडवाव्यात. कार्यकर्त्यांनी संघटनेला प्रथम दर वैयक्तीक हिताला दुय्यम स्थान द्यावे. संघटना अधिकाधिक गावांपर्यंत, शहरापर्यंत नेण्यासाठी गावपातळीपासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्व निवडणुका संघटनेने स्वबळावर लढविणे गरजेचे आहे. त्यातून संघटन बांधणी अधिक मजबूत होऊ शकेल. शेतकरी, कार्यकर्ते, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व पदाधिकारी य चर्चेत सहभागी झाले होते. त्यांनी आपणांस काम करत असताना येणारे विविध अनुभव मांडून त्यावर कसा मार्ग काढला पाहिजे, यावर स्वत:चे विवेचन केले.

कार्यकर्ता कसा असावा? स्वाभिमानी शेतकरी संघटनेम ध्ये सामान्य कार्यकर्त्यांचा भरणा असल्याचे दिसून आले. येथे संघटनेने आणि शासनाने घेतलेले निर्णय सामान्य लोकांना पटवून सांगणारा कार्यकर्ता म्हणजे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता अशी या संघटनची ओळख झाल्याचे सांगण्यात आले. विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांपैकी साडेतीन हजार शेतकऱ्यांच्या कुटुंबाना भेटी देऊन त्यावर अभ्यास केलेले गजानन अहमदाबादकर यांनी सुप्रसिध्द कवी दुष्यंत कुमार यांच्या एका कवितेतील पक्तींतून कार्यकर्त्यांची समर्पक व्याख्या कशी केले आहे ते सांहतात.

सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही।
मेरी कोशिश है की, ये सुरत बदलनी चाहिये।

परिवर्तनावर विश्वास असणारा कार्यकर्ता संघटनेसाठी महत्वाचा आहे. त्याने त्यागाची वृत्ती जोपासने गरजेची आहे. आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेविषयी सामान्य माणसाला आपुलकी आहे. कारण राजू शेट्टीचा साधेपणा व त्यांचे निष्कलंक चारित्र्य यावर लोक विश्वास

पान १३ वर ▸

कायद्याची सोपी मांडणी

▸ पान १२ वरुन

ठेवतात. केवळ आपल्या नेत्यांच्या स्वच्छ प्रतिमेचे दाखले देण्यापेक्षा कार्यकर्त्याने नेत्याकडून चारित्र्य व त्याची सार्वजनिक वर्तवणूक यांची प्रेरणा घेतली पाहिजे. समाज हा कार्यकर्त्यांवा पाहत असतो. त्याचे सातत्याने निरीक्षण करतो. व त्यानंतर त्याच्यावर विश्वास ठेवतो असेही अहमदाबादकर यांनी सांगितले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे यवतमाळ जिल्ह्याचे अध्यक्ष विनायकराव काकडेंनी कार्यकर्ता हा अभ्यासू असला पाहिजे. त्याने समोरच्या माणसाचा प्रतिसाद अभ्यासाच्या माध्यमातून करावा. तसेच माहितीच्या अधिकाराचे शस्त्र वापरून सामान्य माणसाची कामे करायला हवीत. असे मत व्यक्त केले. निवडणुकीच्या राजकारणात यशस्वी व्हायचे असेल तर कार्यकर्त्यांची बांधणी ही भक्कमपणे केली जावी, अशी सुचना सर्वच वक्त्यांनी मांडली.

स्वाभिमानी शेतकरी संघटना एक पर्याय

आज महाराष्ट्रातील शासन व्यवस्था जबाबदार शासन देण्यात सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरली आहे. विदर्भ, मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, कोकणात प्रचंड पावसामुळे पिकांची झालेली नुकसान भरपाई अजूनही शेतकऱ्यांना मिळालेली नाही.

पुन्हा टँकर वाढू लागले

सांगली : दुष्काळी पट्ट्यात यंदा पावसाने चांगलीच ओढ दिल्यामुळे ऐन पावसाळ्यात दुष्काळाची दाहकता वाढू लागली आहे. दुष्काळग्रस्त भागातून टँकरची पुन्हा मागणी वाढू लागल्यामुळे प्रशासनाची धावपळ उडाली आहे. गत आठवड्यात २२७ वर असणारी टँकरची संख्या २६९ वर पोहोचली आहे.

गतवर्षी दुष्काळी भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे दहापैकी आठ तालुक्यांत टंचाई जाहीर करण्यात आली होती. या तालुक्यांतील ४४३ टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्यात आले होते. तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी चारा डेपो, छावण्याही सुरू करण्यात आल्या होत्या. रोजगार हमी योजनेची कामेही मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आली होती.

यंदा पावसाळा तरी दुष्काळग्रस्तांना दिलासा देईल असे वाटले होते. सुरवातीला पावसाने काही ठिकाणी हजेरी लावून आशा निर्माण केली होती. परंतु, गेल्या दोन-तीन महिन्यांत शिराळा आणि वाळवा तालुका वगळता दुष्काळी भागात पावसाने चांगलीच ओढ दिली आहे. तीन महिने उलटले तरीही समाधानकारक पाऊस नाही. शासनपातळीवरून टंचाई ऐवजी आठ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

दुष्काळ जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळाला आहे. मात्र, दुष्काळाच्या सर्व सवलती जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यंत दुष्काळाची दाहकता भेडसावत राहणार आहे. दुष्काळग्रस्त भागात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची सोय करण्यात आली आहे. मागेल त्या गावास आणि वाडीवस्त्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

गेल्या महिनाभरात टँकरची संख्या थोडी कमी झाली होती; परंतु पाऊसच न झाल्यामुळे टँकरची मागणी पुन्हा वाढू लागली आहे. गेल्या आठवड्यात टँकरची संख्या २२७ इतकी होती; मात्र मागणी वाढल्यामुळे टँकरची संख्या २६९ वर पोहोचली आहे. सध्या १८४ गावे, १५४४ वाड्यांतील ४ लाख १३ हजार ६९७ लोकांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

पाणी पुरवठ्यासाठी टँकरच्या ९१२ खेपा मंजूर असून ८६२ खेपा पडत आहेत. पाण्यासाठी दुष्काळी पट्ट्यातील २१२ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. अधिग्रहण केलेल्या विहीर आणि कूपनलिकातील पाण्याचा टँकरद्वारे पुरवठा केला जात आहे.

शेतकरी मित्रांनो जागे व्हा

जमिनीची सध्याची दुर्दशा...

संदेश एन. काळे

पाण्याचा भरपूर वापर व जमिनीतील सेंद्रिय घटकाची कमतरता यामुळे जमिनीची परिस्थिती बिकट होत चालली आहे. म्हणजे काही भागात पाण्याचा भरपूर वापर केल्यामुळे जमिनी आम्ल (क्षारपड) बनत चालल्या आहेत. तर काही भागातील जमिनीत सेंद्रिय कसाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा कस कमी होत चाललेला आहे. अशा जमिनी विम्ल होत चाललेल्या आहेत. रासायनिक खतांचा भरपूर वापर यामुळेच जमिनी आल्म – विम्ल होत चाललेल्या आहेत. ज्या जमिनीचा सामु (पी.एच.) आहे. अशा जमिनी पिकासाठी चांगल्या व योग्य आहेत. म्हणजे अशा जमिनीतील अन्नद्रव्ये पिकांना चांगल्या प्रकारे लागू होतात. आम्लयुक्त जमिनीत जिप्सम चा वापर केल्यास जमिनी सुधारू शकतात. तसेच विम्लयुक्त जमिनीत क्रॅल्शिअम (चुन्याचा) वापर केल्यास जमिनीचा सामु (पी.एच)वाढतो.

म्हणून शेतकरी मित्रांनो जागे व्हा

रासायनिक खतांमुळे जमिनीवर होणार दुष्परिणाम

जमिन व जमिनी गुणधर्म हा त्याच्या मातीकणांच्या रचनेवर अवलंबून असतो. प्रत्येक जमिन ही त्याच्या मातीकणांच्या रचनेनुसार वेगवेगळी असते. जमिनीमध्ये मातीकणांमध्ये पोकळी निर्माण करत असतात. त्यामुळे स्वच्छ सुर्यप्रकाश वनस्पतीच्या मुळांना लागण्यास मदत होते. परिमामी पिकांची वाढ सशक्त व जोमदार होते. असा जमिनचे आवश्यक घटक, शेणखत, सेंद्रिय खते, हिरवळीचे खते. कंपोस्ट खते ही पूर्णान्न आहेत. पण १९६० पासून रासायनिक खते निर्माण झालेली आहेत. व २० वर्षापुर्वी एकरी सरासरी २ पोती रासायनिक खत वपरणारा शेतकरी आज २० पोती वापरून सुध्दा पाहिजे तेवढे उत्पादन घेऊ शकत नाही. याचे कारण म्हणजे रासायनिक खतांच्या भरमसाठ वापरामुळे जमिनीतील जीव, जंतू, जीवाणू तसेच गांडूळ नष्ट होत आहेत. जमिनीचा कस कमी होत आहेत. परिणामी माती कणांची हालचाल न झाल्याने जमिनी घट्ट बनत चालल्या आहेत. जमिनीचा कस कमी होत आहे. सुपिकता नष्ट होत आहे. आणि असाच वापर जर रासायनिक खतांचा करत गेला तर काही कालावधीनंतर सुपिक जमिन शोधूनही सापडणार नाही. सगळीकडे फक्त नापिक जमिनीचं बघायला मिळतील.

म्हणून शेतकरी मित्रांनो जागे व्हा

रासायनिक किटकनाशकांमुळे पिकांवर होणार दुष्परिणामशेतकरी फार पूर्वीपासून शेती करत आलेला आहे. वेगवेगळ्या प्रकारचे फुलधिक, फळपिक, नगदी पिके, भाजीपाला पिके, अशा सर्व पध्दतीचे पिके तो पूर्वीपासून करतो आहे. पूर्वी शेतकऱ्यांना किडींसाठी औषध फवारणे गरजेचे नव्हते. आणि त्याला माहितही नव्हते की पुढे भविष्यात अमूक पिकावरती अमुक हे औषध फवारावे लागेल. पिकांवरती येणारी कीड ही मुख्यत्वे दोन प्रकारची असते. **(क्रमश:)**

दुष्काळग्रस्तांचा अंत पाहू नका

स्वाभिमानीचा रास्ता रोको : जत-सांगली रस्ता ७ तास अडवला

जत : शासनाने दुष्काळग्रस्तांचा अंत पाहू नये, चारा छावण्यांचा निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला. संघटनेच्या वतीने कार्यकर्त्यांनी जनावरांसह ७ तास जत -सांगली रस्त्यावर रास्ता रोको करण्यात आला. लेखी आश्वासनानंतर आंदोलन सायंकाळी साडेसहा वाजता मागे घेण्यात आले. दरम्यान रात्री उशीरा सदाभाऊ खोत, दिनकर संकपाळ यांच्यासह ३० ते ४० जणांवर बेकायदेशीर रास्ता रोको प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

तालुक्यात तीव्र दुष्काळ आहे. पाण्यासाठी लोक टाहो फोडताहेत. जनावरे तडफडून प्राण सोडताहेत. चारा डेपो बंद झाले तर छावण्या सुरू करण्यास विलंब केला जात आहे. त्याच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जत सांगली रस्त्यावरील डफळापूरजवळ व नगर विजापूर राज्यमार्ग उमदीजवळ रास्ता रोखून आंदोलन करण्यात आले.

सुमारे ७ तासांवर आंदोलन झाल्याने जनजीवन विस्कळित झाले. सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखाली घोषणा देण्यात आल्या. नगर व सांगली मार्गावर गाड्यांच्या रांगा होत्या. सांगलीहून येणारे नोकर वेळेत पोहोचू शकले नाही. जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या गाड्या अडकून पडल्या. रास्ता रोको सम जताच वाहतूक नागजमार्ग वळाली. जत, विजापूरकडे जाणाऱ्या गाड्यांना चडचण मार्गे जावे लागले. मध्येच असलेल्या गाड्यातील प्रवाशांना दिवसभर उपाशी राहाये लागले. पाणीही मिळाले नाही.

प्रशासनाने कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र ठोस निर्णयाशिवाय आंदोलन मागे न घेण्यावर ठाम निर्णय त्यांनी घेतला. दिवसभर अनेकांचे हाल झाले. सयाजी मोरे म्हणाले,''दुष्काळाकडे शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. लोकांचा अंत पाहणे बंद करावे; अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात स्वाभिमानी संघटनेच्या वतीने आंदोलन छेडू.''

दिनकर संकपाळ, साहेबराव चव्हाण, रुपेश बडके, राजू पुजारी, संजय चौगुले, अभिजित माळी, दिनकर संकपाळ, विजय चव्हाण, शिवाजी बंडगर, आदी उपस्थित होते.

जनावरांचे हाल

आंदोलनात अनेक शेतकऱ्यांनी जनावरे आणली होती. आंदोलन दिवसभर चालल्याने जनावरांचेही पाणी व चाऱ्याअभावी हाल झाले.

जत तालुका दुष्काळी केल्याचे आदेश द्यावेत

माडग्याळ : उमदी (ता. जत) येथे जत तालुका दुष्काळी तालुका म्हणून जाहीर केल्याचे आदेश तालुका व गावपातळीवरील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना द्यावेत. चाळीस वर्षे तालुका पिण्याच्या व शेती पाण्यापासून वंचित आहे. भरीव निधी देऊन कायमस्वरूपी योजनांना गती द्या, शेतकऱ्यांना जनावरांच्या चाऱ्यासाठी थेट अनुदान बँक खात्यावर वर्ग करा आदी दहा मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आज सकाळी दहापासून बेमुदत रास्ता रोको आंदोलन केले. सर्व गावांत कडकडीत बंद ठेवून व्यापाऱ्यांनी पाठिंबा दिला आहे.

शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत म्हणाले, ''चारा डेपोतून जनावरांना चारा व्यवस्थित मिळाला नाही. आता शासनाने चारा छावण्या काढण्याचा निर्णय घेतला आहे.

पान १६ वर ▸

अन्यायी वीज दरवाढ मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन

कुंडलला बैठक : राजू शेट्टींना निवेदन देणार

कुंडल: अन्यायी व अवाजवी वीजबिले महावितरणने कमी करावीत, अन्यथा वीज ग्राहक बचाव समितीतर्फे आंदोलन केले जाईल, असा इशारा येथे बैठकीत देण्यात आला. शिवाजीराव दौंडे अध्यक्षस्थानी होते.

वर्षभरात महावितरणने चार पाच वेळा वीज दरवाढ केली. ग्राहकांना २४ तास वीज मिळते, म्हणून स्थिर आकार, वीज आकार, वीज शुल्क, इंधन समायोजन आदी आकार लावले जातात. मात्र महिन्याला लोडशेडिंग व वीज बंदचे अनेक दिवस येतात. मात्र पूर्ण महिन्याचा आकार बिलातून घेतला जातो. वाढीव बिल जोपर्यंत कमी होत नाही, तोपर्यंत वीज बिले न भरण्याचा निर्णय झाला. महावितरणच्या अन्यायी वसुलीबाबत खासदार राजू शेट्टी यांना निवेदन देण्याचा निर्णय झाला. ऑगस्टपासून केलेली अन्यायी वीजदरवाढ पूर्णपणे मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

डॉ. श्रीकांत जाधव, डॉ. अनिल पुजारी, राजेश बाबर, बशीर नदाफ, संपतराव सावत, एस. आर. सावंत, किशोर हडदरे, वैभव सावंत, संपत जाधव आदी बैठकीस उपस्थित होते.

राजू शिरगुप्पे यांची निवड

कबनूर : येथील स्वाभिमानी शेतकरी संघटना शाखेच्या अध्यक्षपदी राजू शिरगुप्पे यांची, तर उपाध्यक्षपदी यशवंत चव्हाण व अविनाश पाटील यांची तसेच सचिवपदी सुनील पाटील यांची निवड झाली. जयकुमार कोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस ही निवड झाली. स्वाभिमानी युवा आघाडीच्या अध्यक्षपदी महादेव पाटील यांची, तर उपाध्यक्षपदी शिवगोंडा पाटील-ढंग, पांडुरंग वाकरेकर यांची तसेच सचिवपदी दीपक पाटील यांची निवड झाली. धुळगोंडा पाटील-धुळुसे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुभाष सुतार, अण्णासाहेब पाटील, बाबगोंडा पाटील-धुळुसे, महादेव पाटील, सुधीर काडाप्पा, जिनपाल कोले आदी उपस्थित होते. अध्यक्ष राजू शिरगुप्पे यांनी आभार मानले.

दुष्काळग्रस्तांचा अंत पाहू नका

▶ पान १५ वरून

छावणी सुरू करण्यासाठी टगे लोक पुढे आले आहेत. शासनाने प्रती जनावरास ऐंशी रुपये दर देण्याचे ठरवले आहेत. या टग्यांनी साठ रुपयांमध्ये चारा पुरवण्याचे टेंडर भरले आहे. त्यांना कमी दरात कसे परवडते, छावणीचालक किती खाणार, जत तालुक्यासही तितकाच निधी व पलूस, कडेगाव या मंत्र्यांच्या लहान तालुक्यांनाही याप्रमाणातच निधी मिळवण्याचा डाव सुरू आहे, तो कदापि खपवून घेणार नाही.''

ते म्हणाले, ''ग्रामस्वच्छता अभियानकडून शासनाने संत गाडगेबाबा व तुकडोजी महाराजांचे फोटो गावात लावले. सरपंच गटारी स्वच्छ करू लागला. काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पैसे वाटून सतत तीच माणसे निवडून येतात.''

पलूस पंचायत समितीचे सदस्य संदीप राजोबा, अनिल शिंदे, कृष्णदेव गायकवाड, सुनील पोतदार, संगाप्पा हालके यांची भाषणे झाली. जत तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची सर्व कर्जे व वीज बिल माफ करा. सन २०१२-१३ साठी वाया गेलेल्या खरीप हंगामातील पिकाऊ जमिनीच्या क्षेत्राचे मोजमाप करून शंभर टक्के नुकसान भरपाई द्यावी. मोठ्या जनावरांना रोज शंभर लिटर व लहानास पन्नास लिटर याप्रमाणे पाण्याची तरतूद करावी, अशा मागणीचे निवेदन नायब तहसीलदार अरविंद आडसूळ यांना दिले. सहायक पोलिस निरीक्षक शशिकांत गोडसे यांनी पोलिस बंदोबस्त चोख ठेवला होता.

मागणी वाढल्याने गूळ भडकला

सांगली : दुष्काळामुळे घटलेले उसाचे क्षेत्र, दुसऱ्या बाजूला वाढणारे साखर कारखाने, साखरेचे वाढते दर आणि दिवाळीतील गोडधोड पदार्थांची रेलचेल असल्याने गुळाच्या दरात वाढ होत आहे. प्रतिक्विंटलचा दर ४ हजार ७०० रुपयांपर्यंत गेला असून बाजारात किरकोळ प्रति किलोचा (उच्च प्रतिचा) दर ५० रुपये झाला असून त्यापेक्षा कमी प्रतिचा गूळ ४० ते ३५ रुपये इतका आहे. उसाचे क्षेत्र यंदा आणखी कमी झाल्याने व जनावरांच्या चाऱ्यासाठी उसाचा वापर होत असल्याने गुळाचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त आहे.

येथील वसंतदादा मार्केट यार्डात मोठ्या प्रमाणात गुळाची आवक होते. केशरी रंगाचा गूळ उच्च दर्जाचा, तर त्या खालोखाल तांबडा व पांढऱ्या रंगाचा गूळ असतो. दहा किलोस भेली किंवा ढेप व तीस किलोस रवे असे म्हटले जाते. दररोज साधारणत: २० ते २५ हजार भेली गूळ येतो. बहुतेक गूळ हा कर्नाटकातून येतो. चोख व्यवहार, पारदर्शीपणे कारभार, योग्य दर यामुळे पूर्वीपासून चांगली आवक आहे. गेल्या आठवड्यात सुमारे १३ हजार क्विंटल गुळाची आवक झाली. दरात प्रतिक्विंटलला एक हजार रुपयाने वाढ होऊन तो ४ हजार ७०० रुपयांवर गेला आहे. साखरेचा दर वाढला आहे. गुळाचा साठा कमी आहे. त्यात सध्या श्रावण महिना व सण असल्याने मागणीत वाढ झाल्याने दर वाढले असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. याबाबत चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष व गूळ व्यापारी शरद शहा म्हणाले, ''साखरेचे दर वाढत आहेत. त्याशिवाय उसाचे उत्पादन कमी आहे. त्यातच सणाचे दिवस आहेत. त्यामुळे गुळाच्या दरात वाढत होत आहे. पुढील वर्षी दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.''

हळदीचे क्षेत्र घटले

सांगली : क्विंटलला अडीच हजार रुपयांपर्यंत घटलेले दर, दुष्काळ यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू व आंध्रमधील हळदीचे सुमारे साठ टक्के क्षेत्र घटले आहे. इरोड (तमिळनाडू) येथे झालेल्या हळद परिषदेत ही माहिती पुढे आली. पुढील वर्षी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणार असल्याने हळदीला पुन्हा सोन्याचा भाव येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रती क्विंटलला नऊ हजार रुपयांच्या खाली हळद देऊ नये, असा निर्धार मेळाव्यात केला.

भारतात पूर्वीपासून मसल्याच्या पदार्थांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. त्यात हळदीचे प्रमाण मोठे आहे. आखातासह, युरोपीय देशात येथील हळदीची निर्यात होते. गुणवत्तेची हळद असल्याने बाहेरील देशांतून मागणी वाढत आहे. दोन वर्षांपूर्वी हळदीचा प्रती क्विंटलचा दर २१ हजार रुपयांपर्यंत गेला. हळदीला सोन्याचा भाव आला, अशी चर्चा त्यावेळी झाली. दरात वाढ झाल्याने अनेक शेतकरी हळदीच्या पिकाकडे वळाले. मोठ्या प्रमाणात हळदीची लागवड झाली. परिणामी उत्पादनात दुपटीने वाढ झाली. देशभरात यंदा एक कोट क्विंटल उत्पादन झाले असावे अशा व्यापाऱ्यांचा अंदाज आहे. त्यात तमिळनाडू ५० लाख, आंध्र तीस लाख व महाराष्ट्र, कर्नाटकात २० लाख उत्पादन आहे. त्यातील १४ लाख क्विंटलची आवक येथील बाजारपेठत झाली. गेल्या वर्षी ती ८ लाख क्विंटल होती.

उत्पादनात वाढ झाल्याचे कारण पुढे करीत यंदा हळदीचे दर अडीच हजार रुपयांपर्यंत खाली आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्यात असंतोष पसरला. शेतकऱ्यांनी दोन वेळा आंदोलनही केले. त्यानंतर दरात थोडीफार वाढ झाली. सध्या हळदीचा दर चार ते साडेचार हजार रुपयांच्या दरम्यान आहे. शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी हळद दराबाबत आंदोलन सुरू केले आहे. किमान नऊ हजार रुपये दर मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. दर घसरल्याने इरोड येथे शेतकऱ्यांच्या हळद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, ओरीसा या राज्यांतून मोठ्या संख्येने शेतकरी परिषदेस उपस्थित होते. तमिळनाडू, आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यांत सध्या दुष्काळाची स्थिती आहे. त्या शिवाय अमेरिका, आफ्रि का खंडातही दुष्काळ आहे. घसरलेले दर व दुष्काळ यामुळे हळदीचे देशातील सुमारे साठ टक्के क्षेत्र घसरल्याची माहिती पुढे आली. भारतातून यंदा मोठ्या प्रमाणात हळद निर्यात झाली. सांगलीतूनच सुमारे दोन लाख क्विंटल हळदीची निर्यात झाली. या पार्श्वभूमीवर उत्पादनात घट व मागणी कायम राहिल्यास हळदीचे दर पुन्हा वाढतील, असा अंदाज व्यक्त होत आहे.